पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा
९३, मल्हारपेठ, सातारा - ४१५ ००१ (Maharashtra)
कार्यालय -०२१६२ २३२२२५ फॅक्स ०२१६२-२३०२३२
(ई-मेल sp.satara@mahapolice.gov.in)

---

***प्रेसनोट*** दिनांक.२०/१२/२०२५

सातारा शहर हद्दीतील बॉम्बे रेस्टॉरंट चौक हा अतिशय वर्दळीचा व गर्दीचा चौक आहे. सदर चौकात पुणे, वाढे फाटा, कोरेगांव, रहिमतपुर व कराड बाजुकडुन येणारे वाहनांची संख्या ही मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे बॉम्बे रेस्टॉरंट चौकात वाहतुक कोंडी होत असते. बॉम्बे रेस्टॉरंट चौकात वाहतुक कोंडी होवु नये यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी **दि.२०/१२/२०२५ रोजीचे १०.०० वा.पासुन पुढील आदेशापर्यंत खालील नमुद मार्गावर पुढीलप्रमाणे वाहतुक मार्गात बदल करणेत येत आहे.**

**वाहतुकीकरीता बंदी घालणेत आलेला मार्ग-**

१) जिल्हा परिषद चौक बाजुकडुन बॉम्बे रेस्टॉरंट चौकात आलेनंतर वाहनांना बालाजी ढाबा/ फर्न हॉटेल बाजुकडे उजवीकडे प्रवेश करणेस मनाई करणेत येत आहे.

२) पुणे/वाढे फाटा बाजुकडुन बॉम्बे रेस्टॉरंट चौकात सर्व्हिस रोडने येणारे सर्व वाहनांना बॉम्बे रेस्टॉरंट चौकातुन सातारा शहरात प्रवेश करणेसाठी उजवीकडे वळण घेणेस मनाई करणेत येत आहे.

३) कोरेगांव/एम.आय.डी.सी.बाजुकडुन येणारे वाहनांना बॉम्बे रेस्टॉरंट चौकातुन सरळ शहरात प्रवेश करता येणार नाही.

४) कराड/अजंठा चौक/एमआयडीसी (महिंद्रा शोरुम) बाजुकडुन सर्व्हिस रोडने येणारे सर्व वाहनांना बॉम्बे रेस्टॉरंट चौकात सरळ प्रवेश करणेस मनाई करणेत येत आहे.

५) अजंठा चौक/फर्न हॉटेल बाजुकडुन कोरेगांव/कराड बाजुकडे जाणारी वाहने यांना बालाजी ढाब्याचे समोरील डायव्हर्शनमधुन उजवीकडे प्रवेश करणेस मनाई आहे.

६) बॉम्बे रेस्टॉरंट चौक ते अजंठा चौक व अजंठा चौक ते बॉम्बे रेस्टॉरंट जाणारा सर्व्हिस रस्ता हा एकेरी वाहतुकीकरीता चालु करणेत येत आहे.

७) तसेच बॉम्बे रेस्टॉरंट चौक ते अजंठा चौक व अजंठा चौक ते बॉम्बे रेस्टॉरंट चे दोन्ही सर्व्हिस रस्त्याचे बाजुस वाहने लावनेस मज्जाव करणेत येत आहे.तसेच सदरचा मार्ग हा नो पार्किंग झोन म्हणून घोषित करणेत येत आहे.

***वाहतुकीकरीता पर्यायी मार्ग***

१) पोवई नाका / जिल्हा परिषद चौक मार्गे कोरेगांव बाजुकडे जाणारी वाहने ही बॉम्बे रेस्टॉरंट चौक येथुन सरळ कोरेगांव बाजुकडे जातील.तसेच बालाजी ढाबा/ फर्न हॉटेल बाजुकडे जाणारी सर्व वाहने डायव्हर्शनचा वापर करुन अजंठा चौक बाजुकडे प्रवेश करतील.

२) पुणे/वाढे फाटा बाजुकडुन येणारी सर्व वाहने बॉम्बे रेस्टॉरंट पुलाचे पुर्व बाजुकडुन येवुन बॉम्बे रेस्टॉरंट चौकातुन उजवीकडे वळण न घेता सरळ अजंठा चौक बाजुकडे जावुन डायव्हर्शनचा वापर करुन सातारा शहरात प्रवेश करतील.

३) कोरेगांव/एम.आय.डी.सी.बाजुकडुन येणारी वाहने ही बॉम्बे रेस्टॉरंट चौक येथे डावीकडे वळण घेवुन अजंठा चौक बाजुकडे जावुन डायव्हर्शनचा वापर करुन सातारा शहरात प्रवेश करतील.

४) अजंठा चौक/एमआयडीसी बाजुकडुन/महिंद्रा कंपनी शोरूम येथुन बॉम्बे रेस्टॉरंट चौकात येणारी वाहने ही बॉम्बे रेस्टॉरंट चौकात सरळ न येता डायव्हर्शनचा वापर करून सातारा शहरात प्रवेश करतील.

५) अजंठा चौक/फर्न हॉटेल बाजुकडुन कोरेगांव/कराड बाजुकडे जाणारी वाहने बॉम्बे रेस्टॉरंट चौकातुनच वळण घेवुन कराड/अजंठा चौक बाजुकडे रवाना होतील.

तरी बॉम्बे रेस्टॉरंट चौकात होणारी वाहतुक कोंडी टाळण्यासाठी सदरचा वाहतुक मार्गातील बदल हा प्रायोगीक तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे. या बदलाची सर्व नागरिकांनी नोंद घेवुन काही सुचना करावयाच्या असल्यास मा. पोलीस अधिक्षक कार्यालय/ वाहतुक नियंत्रण शाखा सातारा शहर येथे संपर्क करावा व या वाहतुक बदलाची नोंद घेवुन सर्व नागरीकांनी पोलीस दलास सहकार्य करावे.

.................................................................................................................

प्रति-संपादक

पोलीस अधीक्षक सातारा करीता